पुणे शहर पोलीस

# दर्पण

डिसेंबर २०१९

# अभिप्राय...

प्रती,

**मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
मुंढवा पोलीस ठाणे ,पुणे शहर.
यांना सविनय सादर

**रिपोर्ट** :- पी.एस.भोसले, पो.ना.४४, मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

**विषय** :- दर्पण पुस्तकाबाबत...

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी मुंढवा पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्य करीत असताना नागरीक आपले विविध तक्रारी घेऊन पोलीस ठाणे येथे येत असतात. ठाणे अंमलदार कक्षात नागरीक बसलेले असताना तेथे ठेवण्यात आलेले दर्पण पुस्तक घेऊन ते त्यामधील पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत वाचुन पोलीसांचे कौतुक व समाधान व्यक्त करीत असतात. पुणे पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाची माहिती दर्पण पुस्तकामुळे नागरीकांस मिळते त्याबाबत नागरीकांनी कौतुक व समाधान व्यक्त केल्यामुळे आम्हास चांगले काम करण्याची स्फुर्ती मिळते.

मा.सादर व्हावे.
ता.१८/०६/२०१९

(सही)
पी.एस.भोसले
पोलीस नाईक ४४
मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

---

दि-१८/०६/२०१९.

नाव- एस.एस. मोहिते पो.शि. ११८५ [illegible] विद्यापीठ पो.चौ. [illegible]

विषय- दर्पण पुस्तिका २०१८ बाबत अभिप्राय...

महोदय,

मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी

[illegible] दर्पण-२०१८ [illegible] पोलीस अधिकारी व कर्मचारी [illegible] वर्षातील उत्तम कामगिरीची माहिती [illegible] पुस्तकात [illegible] ही पुस्तिका सर्व पोलीस स्टेशनच्या उपलब्ध [illegible] सर्व पोलीसांची कामगिरी या पुस्तकात [illegible] पोलीस स्टेशनच्या नागरिक [illegible] उपलब्ध [illegible] सर्व पोलीस कर्मचारी व अधिकारी व बाहेरील सर्व लोकांना ही पुस्तिका उपलब्ध [illegible] पुस्तकाची माहिती [illegible] त्यामुळे बाहेरील लोकांना पोलीसांचे कामकाजाबाबत माहित [illegible] लोकांना पोलीसांची कामे व कर्तव्य माहिती [illegible] आपुलकी व आदर सन्मान वाढत चाललेले आहे. व पोलीसांच्या उत्तम कामगिरीची [illegible] होत आहे त्यामुळे [illegible] दरवर्षी [illegible] ही विनंती आहे.

आपला
(सही)
(पो.शि.) ११८५ मोहिते
[illegible]

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) गुन्ह्यांना पायबंद | : | १ ते २० |
| २) कारवाई | : | २१ ते ५० |
| ३) लोकाभिमुख उपक्रम | : | ५१ ते ७८ |
| ४) पोलिसांमधील माणूस | : | ७९ ते ८२ |
| ५) समुपदेशन व सामाजिक बांधीलकी | : | ८३ ते ९२ |
| ६) वाहतुक सुलभता | : | ९३ ते ९६ |
| ७) उत्कृष्ट कार्य | : | ९७ ते १०० |
| ८) उत्कृष्ट तपास | : | १०१ ते ११८ |

# गुन्ह्यांना पायबंद

पुढारी – दि. ६ डिसेंबर, २०१९

# खून करून पळालेल्या खुन्याला पुण्यात बेड्या

**पुणे : प्रतिनिधी**

आंधप्रदेशात चिकन सेंटरच्या दुकानदाराचा खून करून पुण्यात पळून आलेल्या उत्तर प्रदेशातील गुन्हेगाराला युनिट १ च्या गुन्हे शाखेच्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत.

अमीर मुखीमुद्दीन अली ( शहापुर, जि. प्रतापगड, उत्तरप्रदेश) असे ताब्यात घेतलेल्याचे नाव आहे. चिकन सेंटरचा मालक इंतियाज शेख हा आरोपींना लहान लहान कारणावरून तो राहत असलेल्या ठिकाणी येऊन त्याला वारंवार बोलत होता. तसेच अमीरचा अपमानही करत होता. याच कारणावरून अमीर अली, एक भाऊ आणि चुलता यांच्या मदतीने एका चिकन सेंटरचा मालक इंतियाज शेख याचा तीन दिवसांपूर्वी खून करून तो पुण्यात लपण्यासाठी खडकी येथील नातेवाईकांकडे आला होता. याप्रकरणी त्याच्यावर आंध्रप्रदेशातील कडप्पा जिल्ह्यातील पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



**आंध्रप्रदेशातून खून करून पळालेल्या खुन्याला पुण्यात जेरबंद केल्यानंतर पोलिस अधिकारी व कर्मचारी.**

खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीची गुप्त बातमीदाराकडून माहिती काढून त्यास कडप्पा पोलिसांच्या हवाली करण्यात आले. पोलिस पेट्रोलिंग करत असताना तो सापडला होता. ही कारवाई अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंग, सहायक पोलिस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरूण वायकर, पोलिस उप निरीक्षक उत्तम बुदगुडे, पोलिस नाईक सचिन जाधव, तुषार माळवदकर, इम्रान शेख, गजानन सोनुने, सुधाकर माने, योगेश जगताप, सुभाष पिंगळे, उमेश काटे, तुषार खडके, विजयसिंग वसावे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# गावठी दारूचे १५ हजार लिटर रसायन नष्ट

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) – कंजारफाट वस्तीत राहत्या घरासह टेरेसवर गावठी दारू तयार करण्याच्या ठिकाणावर गुन्हे शाखेने छापा टाकला. त्याठिकाणी दारू बनविण्यासाठी वापरण्यात येणारे ५८ हजार रुपये किंमतीचे १५ हजार लीटर रसायन नष्ट करीत दोघांना जेरबंद केले.

सरवीण कालकर आणि राजेश कालकर (दोघेही रा. संतोषनगर झोपडपट्टी, कंजारफाट वस्ती, वानवडी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कंजारफाट वस्तीत मोठ्या प्रमाणात देशी दारू तयार करण्यात येत असल्याची माहिती गुन्हे पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकून २७० लीटर देशी दारू आणि १५ हजार लीटर रसायन नष्ट केले.

### गणेश पेठेतील दुकानातून ७ लाखांची अवैध सिगारेट जप्त

वैधानिक इशारा नसलेल्या आणि अवैधरीत्या विदेशी सिगारेटची विक्री करणाऱ्या दुकानदाराकडून अमली पदार्थ विरोधी पथकाने सर्व माल ताब्यात घेतला. त्याच्या दुकानातून ७ लाख रुपये किमतीच्या विदेशी सिगारेट जप्त केल्या. ही कारवाई अमली पदार्थ विरोधी पथकाने नुकतीच गणेश पेठेतील पांगुळ आळीत असलेल्या दुकानावर केली. प्रकाश मनोहरलाल जैनानी (वय ३१, रा. आझादनगर, हडपसर) असे ताब्यात घेतलेल्या दुकानदाराचे नाव आहे. त्याला फरासखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

### पूर्ववैमनस्यातून तरुणावर कोयत्याने वार

पूर्ववैमनस्यातून तिघांनी मिळून तरुणावर कोयत्याने वार केला. ही घटना दोन दिवसांपूर्वी रात्री साडेअकराच्या सुमारास लोहियानगर परिसरातील स्वच्छतागृहासमोर घडली. याप्रकरणी इम्रान शेख (वय २२, रा. लोहियानगर) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. इम्रान आणि आरोपींमध्ये काही दिवसांपूर्वी वाद झाले होते. त्याचा राग आल्यामुळे तिघांनी मिळून इम्रानवर कोयत्याने वार केले.

# जुगार खेळणारे सहाजण ताब्यात

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) – लॉटरीच्या नावाखाली जुगार खेळणाऱ्या सहाजणांना गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून ११ हजारांची रोकड जप्त करण्यात आली. ही कारवाई उत्तमनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एनडीए रस्त्यावर सुरू असलेल्या जुगारअड्ड्यावर केली.

गणेश बारणे (रा. पर्वती), संदीप भोसले (रा. कोथरूड), हर्षल गायकवाड (रा. गुरुवार पेठ), सुशील चव्हाण (रा. कात्रज), तुषार शिंदे (रा. कात्रज) आणि सुशांत शिंदे (रा. कोंढवा) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध उत्तमनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. एनडीए रस्त्यावर छुप्या पद्धतीने जुगारअड्डा सुरू होता. त्याची माहिती गुन्हे पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड यांना मिळाली. त्यानुसार पथकाने त्याठिकाणी छापा टाकून सहाजणांना ताब्यात घेतले. त्याठिकाणी गणेश आणि संदीप जुगार खेळत होते, तर इतर चौघे खेळत असताना पकडण्यात आले.

प्रभात – दि. ३० डिसेंबर, २०१९

# पोलीस झाले सजग ; अवैद्य धंद्यांना लावला चाप

## गुन्हे शाखेच्या विविध पथकांकडून हॉटेल, बार, पब, देशी दारूच्या अड्डयांची तपासणी

पुणे, दि. २९- नववर्षाच्या स्वागतानिमित्त शहरात कोणत्याही प्रकारे अवैध धंदे तसेच अंमलीपदार्थांची विक्री होऊ नये यासाठी पुणे पोलीस सजग झाले आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी शहरातील हॉटेल, बार, पब तसेच देशी दारूच्या अड्डयांची तपासणी करून कारवाई केली. गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

वानवडी पोलीस स्टेशन हद्दीतील कंजारफाट वस्ती या भागाची युनिट पाच कडील अधिकारी व कर्मचारी यांनी पाहणी केली. यावेळी त्यांना परिसरात मोठ्या प्रमाणात राहत्या घरात व टेरेसवर अशा ठिकाणी देशी दारू तयार करून अवैध धंदे सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सदर कारवाई युनिट कडील ३ अधिकारी व १० कर्मचारी, तसेच भरोसा सेल कडील १ अधिकारी व ९ महिला कर्मचारी, तसेच गुन्हे शाखेकडील अन्य युनिटचे ११ कर्मचारी यांचेसह वानवडी पोस्टे हद्दीतील संतोषनगर, कंजारभटवस्ती येथे कारवाई केली. तेथील रसायनचे आधारे दारू तयार करून विक्री करणारे सवीण कालकर (रा. संतोषनगर झोपडपट्टी, कंजार फाट वस्ती, वानवडी), राजेश कालकर (रा. संतोषनगर झोपडपट्टी, कंजार फाट वस्ती, वानवडी)यांच्याविरुद्ध वानवडी पोस्टे येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथक स्वारगेट व सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गुलटेकडी येथील गोल्डन बेकरीसमोर ताडी विक्री होत असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार दोघांना ताब्यात घेऊन १५५ लिटर ताडी व रोख २४२० रुपये असा ४८८५ रुपयांचा माल जप्त करण्यात आला. गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने ७७ हॉटेल आणि बारची तपासणी केली. तपासणीत कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन हद्दीतील सिनेगो बार अँड रेस्टॉरंट, इफिंगनट बार अँड रेस्टॉरंट, कोंढवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिट्टज बार अँड रेस्टॉरंट, चतु:शृंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हॉटेल हायलँड, टेल्स अँड स्पीसीट यांच्यावर जास्तवेळ चालू ठेवल्याने कारवाई केली.

### ७ लाखांचे तंबाखूजन्य, सिगारेट जप्त

मे. एस. राजेश ट्रेडर्स (१७४/१, गणेश पेठ, पांगुळ आळी) या होलसेल दुकानाचे चालक प्रकाश मनोहरलाल जैनानी ( ३१ रा. नरेन हिल्स, आझादनगर, महंमदवाडी, हडपसर) याच्या दुकानातून रु. ७, ०४, ६२५ किंमतीचा मुद्देमाल पंचासमक्ष पंचनाम्यासह पोलिसांनी जप्त करून पुढील कारवाईसाठी फरासखाना पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आला आहे.

Pune Mirror - 27 December, 2019

# Sacked Jalgaon cop arrested in jewellery store robbery case

**Crime branch picks up duo, including dismissed constable, for looting Kothrud showroom of Pethe Jewellers at gunpoint, stealing goods worth over ₹10 lakh**



The heist had been caught on CCTV camera at the shop on November 24

Archana.More@timesgroup.com
TWEET @Archana_Mirror

The crime branch unit-3 of Pune police has cracked the Pethe Jewellers robbery case, arresting two persons, including a sacked police constable of Jalgaon.

The duo has been identified as Sushil Magre (32), a resident of Jalgaon, and Amit alias Nitesh Chaudhari (20). They were taken to custody from Jalgaon central jail on Wednesday night.

On Thursday, they were produced in the Pune court of judicial magistrate first class (JMFC), who remanded them in four days of police custody. Magre used to work with Jalgaon police, but he was dismissed for the last two years. Magre has been booked by Jamner, Jalgaon and Pahur police for several offences of theft, robbery and house break-ins.

On November 24, two gun-wielding dacoits looted Pethe Jewellers in Kothrud's Anand Nagar. The duo looted gold ornaments worth over Rs 10 lakh from the jewellery shop and while fleeing, the gang opened fire in the air, sending shockwaves in the locality. The entire incident was recorded on the closed-circuit television (CCTV) camera of the jewellery shop where the dacoits are clearly spotted looting the shop at gunpoint.

The officers of crime branch unit-3 were investigating the case. They had received a tip-off about the accused. When the cops reached Jalgaon police, they came to know the duo was in jail. The officers took them in custody through production warrant and arrested them in the Pethe Jewellers robbery case.

Police sub-inspector Kiran Adagale, attached with crime branch unit-3, submitted that the duo was staying in Delhi, Kolkata, Ajmer, Punjab, Jabalpur and other towns of Madhya Pradesh. It is suspected that they might have sold the stolen jewellery in all these places. PSI Adagale further submitted that the accused used an armed weapon while committing the robbery. It is necessary to investigate that from whether they had bought the gun and if they used the same while committing same kind of offences, he submitted. "Magre would work with police therefore he has used multiple SIM cards and mobile handsets, which need to be seized. In order to investigate the offence in details and to seize the weapon and recover stolen property, their 14-day police custody is required," the officer submitted to the court.

Pune Mirror - 21 December, 2019

# Police nab Buldhana agri officer, family for alleged involvement in Chandan Nagar robbery


## Cops trace accused by the agriculture dept car used in the crime

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

In a new turn of events, with regard to a robbery case that took place in Chandan Nagar about a fortnight ago, it has now been revealed that an agricultural officer's family is also involved in the crime. The incident had occurred at the office of India Infoline Financial Limited (IIFL) in Chandan Nagar. The cops had first arrested two men in connection with the case. After a while, the cops conducted further probe and found that Subhash Ramchandra Rathod, 57, an agricultural officer of Buldhana Zilla Parishad, was also involved in the crime. The accused used an agriculture department vehicle to conduct the robbery, following which they absconded from the spot. When police traced the car number and conducted inquiry about the vehicle registration, they found that Rathod's family was also involved in the act. The family helped the accused hide the stolen gold jewellery. Two women have also been arrested in this regard.

The entire Rathod family was apparently aware of the hatched plan. Police arrested Subhash and Ajay Rathore.

According to police, accused Subhash Rathod is father-in-law of Deepak Jadhav. The robbery was allegedly planned by Ajay Rathod and Deepak Jadhav. They conducted a recce of the office premises. Jadhav was earlier a visionary officer of ST mahamandal, and lost his job due to departmental inquiry. After 2017, his case was dismissed by the court. However, since he had already



A CCTV footage of the crime taking place

lost his job, he was in need of money. He confided in his brother-in-law Ajay and wanted to start a business. Then Ajay introducing him to his friend Manish Yadav, the mastermind of the robbery and is still absconding.

Shankar Khatke, senior police inspector attached with Chandan Nagar police station, told *Mirror*, "Earlier we arrested two accused. Then we got a link of the involvement of the agricultural officer in the crime. Our team went to the officer's house. We recovered the gold jewellery worth Rs 4 crore, which was robbed by the accused. When probed, the officer accepted his crime and said that he supported the accused in the crime. Further investigation is on."

# जुगार अड्ड्यावर छापा; सहा ताब्यात

**पुणे :** गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाने उत्तमनगर परिसरातील जुगार अड्ड्यावर छापा टाकून सहा जणांना ताब्यात घेतले. यावेळी जुगार अड्ड्यावरून अकरा हजार रुपयांचा मुद्देमालदेखील पोलिसांनी हस्तगत केला आहे.

पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम आणि अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे यांनी शहरातील अवैध धंद्यांवर कारवाई करून अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार गुन्हे शाखेचे युनिट तीनचे पथक हद्दीमध्ये गस्तीवर असताना उपनिरीक्षक संजय गायकवाड यांना मिळालेल्या माहितीनुसार पथकाने छापा टाकला. त्यावेळी त्या ठिकाणी गणेश प्रकाश बारणे (रा. पर्वती), संदीप दशरथ भोसले (रा. कोथरूड) हे दोघे अनधिकृतपणे लॉटरीच्या नावाखाली जुगार घेताना आढळले, तर हर्षल अशोक गायकवाड (रा. गुरुवार पेठ), सुशील प्रदीप चव्हाण (रा. कात्रज), तुषार दत्ता शिंदे (रा. दत्तनगर), सुशांत शिवाजी शिंदे (रा. कोंढवा) हे जुगार खेळताना आढळले. या सर्वांना ताब्यात घेण्यात आहे. तसेच जुगाराच्या साधनसामग्रीसह ११ हजारांचा ऐवज हस्तगत करण्यात आला. ही कामगिरी पोलिस उपायुक्त बच्चनसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, पोलिस उपनिरीक्षक संजय गायकवाड, किरण अडागळे, सहायक फौजदार अनिल शिंदे, दत्तात्रय गरुड, हवालदार रामदास गोणते यांच्या पथकाने केली.

पुढारी – दि. २८ डिसेंबर, २०१९

# दोन सोनसाखळी चोरट्यांना पकडले

- शहरातील आठ गुन्हे उघडकीस
- विश्रांतवाडी, सांगवी, खडकीत घातला होता धुमाकूळ
- सीसीटीव्ही फुटेजच्या साहाय्याने काढला आरोपींचा माग
- विश्रांतवाडी पोलिसांची कारवाई

पुणे : प्रतिनिधी

पुण्यासह पिंपरी-चिंचवड परिसरात पादचारी महिलांच्या सोन साखळ्या हिसकाणाऱ्या दोन चोरट्यांना पाठलाग करून पोलिसांनी अटक केली आहे. सीसीटीव्हीवरून पोलिसांनी दोघांचा माग काढून त्यांना जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

दीपक परशुराम माळी (वय २१) आणि प्रविण निलेश कछवे (वय ३०, केशवनगर, मुंढवा) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत.

विश्रांतवाडी परिसरात तीन दिवसांपूर्वी केवळ दहा मिनिटांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी पादचारी महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावण्यात आल्या होत्या. याप्रकरणी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या चोरट्यांचा माग गुन्हे शाखेसह स्थानिक पोलिस करत होते.

चोरीच्या गुन्ह्याचा तपास करत असताना फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी सांगितलेल्या वर्णनावरून काळ्या रंगाच्या नंबर नसलेल्या होंडा शाईन गाडीवरील दोन संशयित आरोपी विद्यानगरच्या दिशेने गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून वरिष्ठांच्या आदेशाने विश्रांतवाडी पोलिस स्टेशनकडील पोलिस कर्मचारी प्रविण भालेचिम, प्रफुल्ल मोरे व गुन्हे शाखा युनिट चारकडील कर्मचारी अतुल मेंगे, अशोक शेलार यांनी आरोपी ज्या मार्गाने गेले तेथील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यांना विमाननगर मार्गे नगररोडकडून खराडीमार्गे केशवनगर मुंढवा भागात जाताना व येताना दिसले. त्यानंतर सीसीटिव्ही फुटेजवरून ते मुंढवा भागातच कोठेतरी वास्तव्यास असल्याचा संशय आल्याने गुन्ह्याच्या तपास कामी चार टीम तयार करण्यात आल्या. गाडीच्या आजूबाजूला सापळा लावून थांबल्यानंतर नंबर नसलेल्या होन्डा शाईन गाडीजवळ दोघेजण घुटमळताना दिसले. त्यानंतर त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता ते गल्लीतून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्यांना पाठलाग करून पकडण्यात आले. त्यांना अटक केल्यानंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून सोनसाखळी चोरीचे आठ गुन्हे उघडकीस आले आहेत. अपर पोलिस आयुक्त सुनील फुलारी, परिमंडळ चारचे पोलिस उपायुक्त पंकज देशमुख, सहायक पोलिस आयुक्त लक्ष्मण बोराटे, विश्रांतवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरूण आव्हाड, पोलिस निरीक्षक गुन्हे रविंद्र कदम, गुन्हे शाखा युनिट चारचे पोलिस निरीक्षक गुन्हे अंजूम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप यादव व तपास पथकाचे कर्मचारी विजय सावंत, प्रविण भालचिम, यशवंत किर्वे, किशोर दुशिंग, अझरूद्दीन पठाण, अनिकेत भिंगारे, प्रफुल्ल मोरे, रिहाण पठाण, शेखर खराडे, संदीप देवकाते, शाम शिंदे, व गुन्हे शाखेचे युनिट चार चे कर्मचारी अतुल मेंगे, अशोक शेलार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

सायबर पोलिसांची कारवाई : दोघांना अटक; भीती दाखवून घालायचे गंडा

# हजारो अमेरिकन नागरिकांची फसवणूक; कॉल सेंटर उद्ध्वस्त

लोकमत न्यूज नेटवर्क


पुणे : ड्रग्ज ट्रॅफिकिंगसाठी तुमच्या सोशल सिक्युरिटी नंबरचा वापर झाला असल्याची भीती दाखवून अमेरिकन नागरिकांची फसवणूक करणारे कॉल सेंटर सायबर पोलिसांनी उद्ध्वस्त केले आहे. यामधील दोघांना अटक केली आहे. कॅम्पमधील प्लेस ऑफ वर्कशिप बिल्डिंगमध्ये किंगस्टन मीडिया या नावाने हे कॉल सेंटर चालविले जात होते. या कॉल सेंटरमधून हजारो अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली गेल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

आकीब अल्ताफ शेख (वय २७, रा. साईबाबानगर, कोंढवा) आणि सारीम अमान शेख (वय २९, रा. भीमपुरा गल्ली, कॅम्प) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. या ठिकाणी त्यांनी ८ जणांना कामाला ठेवले होते. या कॉल सेंटरमधून ३ मोबाईल, १० संगणक हार्डडिस्क, ३ राऊटर, ८ हेडफोन, १ पेनड्राइव्ह, स्क्रिनशॉटचे ३० पाने असा माल हस्तगत केला आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, कॅम्पमधील या कॉल सेंटरमधून अमेरिकेतील नागरिकांना बनावट नाव धारण करून ते सोशल सिक्युरिटी ॲडमिनिस्ट्रेशन विभागातून बोलत असल्याचे सांगत. त्यांच्या सोशल सिक्युरिटी ॲडमिनिस्ट्रेशन नंबरवरून अनयुज्वल ॲक्टिव्हिटी करण्यात येत असल्याची भीती दाखवत व अमेरिकन नागरिकांना त्यांचे नाव, पत्ता व सोशल सिक्युरिटी नंबर विचारत. त्यानंतर तपासणी केल्याचे दर्शवत त्यांचा सोशल सिक्युरिटी नंबरचा वापर ड्रग्स ट्रॅफिकिंगसाठी झाला आहे, असे सांगून सेटलमेंटसाठी यूएसए ट्रेझरी विभागाशी संपर्क करा, असे सांगतात. त्यानंतर कॉल ऑफिसमधील दुसऱ्या क्रमांकावर तो कॉल फॉरवर्ड करून ते यूएसए ट्रेझरी विभागामधून बोलत असल्याचे सांगत. अमेरिकन नागरिकांना कारवाईची भीती दाखवून अमेरिकन नागरिक सेटलमेंटसाठी तयार झाल्यावर त्यांना २०० ते ५०० डॉलरचे वॉलमार्ट गिफ्टकार्ड, ईबे गिफ्टकार्ड, टार्गेट गिफ्टकार्ड, बेस्टबाय गिफ्टकार्ड यांची खरेदी करायला सांगत. त्यांच्याकडून त्या गिफ्ट कार्डचा नंबर घेऊन त्या कार्डचे पैशात रुपांतर करून घेऊन अमेरिकन नागरिकांची फसवणूक करीत असल्याचे उघड झाले आहे. याबाबत अमेरिकेतून तक्रार आल्यानंतर सायबर पोलिसांनी कॅम्पमधील या कॉल सेंटरवर छापा घातला.

ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, सहायक पोलीस निरीक्षक गंगाधर थावरे, हवालदार अस्लम अत्तार, पोलीस नाईक अजित कुऱ्हे, योगेश वाव्हळ, संतोष जाधव, प्रसाद पोतदार, प्रवीणसिंग राजपूत, ज्योती दिवाणे यांनी केली आहे.

## दुसऱ्याच्या हाताखाली फसवायला आता स्वत:च टाकले कॉल सेंटर



- आकीब शेख आणि सारीम शेख या दोघांनी २ महिन्यांपूर्वी हे कॉल सेंटर सुरू केले होते. ते दोघेही फक्त १२ वीपर्यंत शिकले आहेत. इंग्रजीवर चांगले प्रभुत्व आहे. अमेरिकन स्टाईलचे इंग्रजी बोलू शकणाऱ्या अशा ८ जणांना त्यांनी कामाला ठेवले होते. यापूर्वी ते अशाच एका कॉल सेंटरमध्ये अहमदाबाद येथे काम करत होते.
- तेथे अमेरिकन नागरिकांना कसे फसविता येईल हे शिकले होते. तेथे मिळालेल्या गुन्हेगारी शिक्षणाच्या जोरावर त्यांनी पुण्यात हे कॉल सेंटर सुरू करून अमेरिकन नागरिकांची फसवणूक करण्यास सुरुवात केली होती.
- दिवसभरात ते अनेक अमेरिकनांना फोन करीत असत. त्यातील काही जण त्यांच्या गळाला लागत. त्यांच्याकडून मिळालेले गिफ्टकार्ड आपल्या अमेरिकन साथीदारांच्या मदतीने वठवत असत. त्यांनी आतापर्यंत किती जणांची फसवणूक केली, याची माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे.

### पुणे पोलिसांनी केलेली यापूर्वीची कारवाई

*अमेरिकन नागरिकांना वेगवेगळ्या प्रकारे भीती दाखवून त्यांच्याकडून लाखो डॉलर उकळण्याच्या घटना पुणे पोलिसांनी यापूर्वी उघडकीस आणल्या आहेत.*

**जानेवारी २०१८** – गुन्हे शाखेने खराडी येथील कॉल सेंटरवर छापा घालून दोघांना अटक केली होती.

**फेब्रुवारी २०१८** – कोरेगाव पार्क येथे सुरू असलेल्या बनावट कॉल सेंटरमधून ११०० अमेरिकन नागरिकांची फसवणूक केल्याचा प्रकार पोलिसांनी उघडकीस आणला होता. टॅक्समध्ये चोरी केल्याचे भासवून त्यांना लुबाडणाऱ्या तिघांना अटक केली होती.

**फेब्रुवारी २०१७** – बनावट कॉल सेंटरमार्फत अमेरिकन नागरिकांना टॅक्स चोरी केल्याचे भासवून त्यांच्याकडून लाखो डॉलर अनपेड टॅक्स वसूल करणाऱ्या तिघांना अटक केली होती.

# सराईत गुन्हेगार जाळ्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सुट्टे पैसे देऊन बंदे रुपये पाहिजे असल्याचे सांगून हातचलाखी करून लोकांची फसवणूक करणाऱ्या व यापूर्वी २२ गुन्हे असलेल्या सराईत चोरट्याला गुन्हे शाखेच्या युनिट १ ने पकडले. खोपोली येथे अशा प्रकारे फसवणूक करून आल्याची माहिती मिळाल्यानंतर ४८ तासांच्या आत पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

इब्राहिम बाबू इराणी (वय ५१, रा. विष्णुकृपानगर, इराणीवस्ती, शिवाजीनगर) असे त्याचे नाव आहे.

गुन्हे शाखेच्या युनिट १ च्या पथकातील पोलीस नाईक श्रीकांत वाघवले व इरफान मोमीन यांना खोपोली येथे चोरी करून पुण्यात आलेला एक जण शिवाजीनगर येथील एसटी बसस्थानकाजवळ उभा असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक अरुण वायकर यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक उत्तम बुदगडे, हवालदार वाय. एम. जगताप, एस. के. वाघवले, इरफान मोमिन, सुधीर माने, सहायक फौजदार बाबा चव्हाण, सुभाष पिंगळे यांनी शिवाजीनगर एसटी बसस्थानकाच्या जवळ उभ्या असलेल्या इराणी याला ताब्यात घेतले. त्याच्या झडतीत ५ हजार ७०० रुपये मिळाले. त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने खोपोली येथे एकाला फसविले असल्याची कबुली दिली. खोपोली पोलिसांकडे चौकशी केल्यावर असिफ शमीम शाह यांना १२ डिसेंबरला सुट्टे पैसे देऊन पाचशे रुपयांच्या नोटा हव्या असल्याचे सांगून हातचलाखी करून पैसे चोरून नेले होते.

- इब्राहिम इराणी हा सराईत चोरटा आहे. त्याच्या नावावर यापूर्वी पुणे शहर, पिंपरी चिंचवड, शिरूर, शिर्डी, सोलापूर भागात एकूण २२ गुन्हे दाखल आहेत.
- इराणी याला पकडून पोलिसांनी अधिक तपासासाठी खोपोली पोलिसांच्या हवाली केले आहे.

# Cops rescue 3 women from flesh trade, nab 2

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Officials of the Social Security Cell (SSC) of Pune police crime branch rescued three women, who were forced into prostitution through online escorting.

Police officials have arrested two persons, Uttam Kamble and Sanjay Audapure, in this case.

The police said that constable Pushpendra Chavan had received a tip-off about women being forced into prostitution. Accordingly, officials of SSC raided Hotel Crystal near Pune station and nabbed Sanjay. Later, police officials also arrested Uttam for allegedly running the escort services. Police officials rescued two women from the location.

In another incident on November 28, police raided Swasti Hotel on Apte road and rescued a woman. However, police are yet to arrest the accused.

# मनपात नोकरीच्या आमिषाने फसवणाऱ्या महिलेला अटक

## २५ लाखांना घातला होता गंडा : १० तरुणांची आर्थिक फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : महापालिकेच्या विविध विभागांमध्ये कायमस्वरुपी नोकरी लावण्याच्या बहाण्याने आर्थिक फसवणूक करणाऱ्या महिलेला येरवडा पोलिसांनी अटक केली आहे. स्मिता विठ्ठल मुळीक (रा. नाना पेठ) असे अटक केलेल्या महिलेचे नाव आहे. पुणे शहर व ग्रामीण भागातील १० तरुणांची अशाच प्रकारे आर्थिक फसवणूक करत तब्बल २५ लाखांचा गंडा घातल्याचे पोलिस तपासात पुढे आले आहे.

हा प्रकार २०१५ ते २०१९ या कालावधीत घडला होता. स्मिता मुळीक व तिचा साथीदार सुनील घारे (रा. येरवडा) यांनी सद्दाम शेख व त्यांचा मित्र राजेंद्र गाडे या दोघांचा नोकरीच्या आमिषाने विश्वास संपादन करत साडेआठ लाख रुपये घेतले होते. मात्र, त्यांना नोकरी न लावता किंवा त्यांचे पैसे परत न देता आर्थिक फसवणूक केली होती. याप्रकरणी दोघांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. परंतु, गुन्हा दाखल झाल्यापासून दोघेही फरार झाले होते.

दरम्यान, दाखल गुन्ह्याचा तपास करीत असताना पोलीस उपनिरीक्षक शांतमल कोळ्ळुरे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली होती, की स्मिता मुळीक ही विश्रांतवाडी परिसरात भाड्याने खोली घेऊन वास्तव्यास आहे. त्यानुसार महिला कर्मचारी स्वाती म्हस्के, सचिन जाधव यांच्या पथकाने महिलेला अटक केली. तिचा साथीदार सुनील घारे या फरार आहे. अशा प्रकारे या दोघांनी अनेकांना गंडा घातल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, जर कोणाची अशी फसवणूक झाली असेल तर नागरिकांनी येरवडा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# सोनसाखळी चोरणाऱ्या सराईताला अटक

पुणे : शहरात सोनसाखळी चोरी व वाहन चोऱ्या करणाऱ्या सराईताला गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून सोनसाखळी चोरीचे १०, वाहनचोरीचे चार व हातचलाखीने फसवणुकीचे चार असे एकूण १८ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्याच्याकडून सहा लाख ३९ हजार रुपये किमतीचे दागिनेही जप्त करण्यात आले आहेत.

शब्बीर जावेद जाफरी (वय ३२, रा. पठारे वस्ती, लोणीकाळभोर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. शहरात सोनसाखळी चोरी व वाहनचोरीचे गुन्हे रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यानुसार युनिट पाचकडून आरोपींची माहिती काढण्यात येत होती. त्या वेळी पुणे-सोलापूर रस्त्यावर हडपसर येथील रविदर्शन येथे सराईत आरोपी जाफरी येणार असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून, त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याजवळील दुचाकीबाबत चौकशी केली, तेव्हा ती दुचाकीही चोरीची असल्याचे आढळले. ती दुचाकी त्याने परभणी जिल्ह्यातील नानलपेठ येथून २०१८ मध्ये चोरल्याचे निष्पन्न झाले. त्याने सोनसाखळी व वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे आढळून आले. त्याने त्याचा साथीदार दावूभाई इराणी (रा. भोपाळ) याच्या मदतीने सोनसाखळी चोरी आणि वाहनचोरीचे १४ गुन्हे केल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याच्याकडून १५० ग्रॅम दागिने, चार मोटारसायकल असा एकूण सहा लाख ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### छत्तीसगड, मध्य प्रदेशातही गुन्हे

आरोपी जाफरी व त्याचा साथीदार दावूभाई या दोघांनी छत्तीसगड, मध्य प्रदेशात सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या दोन राज्यातील वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात २० ते २५ गुन्ह्यात दोघे फरारी असून, या दोघांचा शोध सुरू आहे. या दोघांचे सीसीटीव्ही फुटेजदेखील त्या राज्यातील पोलिसांकडे आहे. त्यामुळे पुणे पोलिसांचा तपास झाल्यानंतर जाफरीचा ताबा त्या राज्यातील पोलिस घेऊ शकतात.

# सट्टा घेणाऱ्या तिघांना अटक

## मार्केटयार्ड परिसरात कारवाई; ६८ हजारांचा ऐवज जप्त

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) - हिंदुस्थान आणि वेस्ट इंडिजदरम्यान काल खेळल्या गेलेल्या सामन्यावर सट्टा स्वीकारणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेने जेरबंद केले. त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम, सहा मोबाईल, लॅपटॉप, टीव्ही, विद्युत उपकरणे मिळून ६८ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला. ही कारवाई काल मार्केटयार्ड परिसरातील लालबाग हौसिंग सोसायटीमध्ये करण्यात आली.

प्रवीण हुंबरलाल पटवा (वय ६४), देवेश प्रवीण पटवा (वय २०, दोघेही रा. मार्केटयार्ड), राजेंद्र मळीबा चोरगे (वय ५४, रा. नाना पेठ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

काल हिंदुस्थान आणि वेस्ट इंडिज देशांमध्ये टी-२०चा सामना सुरू होता. त्यावेळी मार्केटयार्डमधील लालबाग सोसायटीत राहत्या घरी प्रवीण लोकांकडून सट्टा स्वीकारत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकला असता, हिंदुस्थान आणि वेस्ट इंडिज सामन्यावेळी प्रवीणसह देवेश आणि राजेंद्र सट्टा घेत असल्याचे दिसून आले. त्यानुसार पोलिसांनी तेथील रोख रक्कम, सहा मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप जप्त करून तिघांना अटक केली. ही कामगिरी पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नीलेश महाडिक यांच्या पथकाने केली.

# टिळक स्मारक येथे दुचाकी चोरटा जेरबंद

पुणे, दि. १७ (प्रतिनिधी) – टिळक स्मारक रस्त्यावरून दुचाकीची चोरी करणाऱ्या एकाला विश्रामबाग पोलिसांनी जेरबंद केले. त्याच्या ताब्यातून २५ हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त केली.

अक्षय भुजंग नायडू (वय २५, रा. मंगळवार पेठ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी पराग पोपटराव राऊत (वय ४४, रा. सिंहगड रस्ता) यांनी ठाण्यात फिर्याद दिली आहे.

राऊत यांनी ७ सप्टेंबरला टिळक स्मारकजवळ दुचाकी उभी केली होती. ते मित्रासोबत चहा पिण्यासाठी गेले असता, त्यांची दुचाकी चोरीस गेली होती. विश्रामबाग पोलिसांनी संशयावरून अक्षयला पकडले. ही कामगिरी पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, सहायक पोलीस आयुक्त सुधाकर यादव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादासाहेब चुडाप्पा, पोलीस निरीक्षक राजा राजमाने, पोलीस उपनिरीक्षक सचिन जगदाळे, विनोद ओंबासे यांच्या पथकाने केली.

# कोंढव्यात सात लाखांच्या विदेशी सिगारेट जप्त

पुणे, दि. १४ (प्रतिनिधी) – शरीरास अपायकारक विदेशी बनावटीच्या सिगारेट विक्री करणाऱ्या कोंढव्यातील दोन दुकानांवर अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई केली. दोन्ही दुकानांतून सुमारे ६ लाख ९५ हजारांच्या विदेशी बनावटीच्या सिगारेट जप्त करण्यात आल्या आहेत.

एस. के. ट्रेडर्स, मयूर पंख बिल्डिंग, शॉप नं. ४ या दुकानांतून ४ लाख ६३ हजार ९०० आणि न्यू बालाजी होलसेल दुकान, खुशी कॉर्नर, शिवनेरीनगर, कोंढवा येथून २ लाख ३२ हजार ९० रुपये किमतीच्या सिगारेट जप्त केल्या. दुकानांचे मालक अनुक्रमे साकीब अबुजा शेख व सुरेश मोहनलाल भाटी यांच्याविरुद्ध सिगारेट व तंबाखूजन्य इतर उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण विनियमन) अधिनियम २००३ व २००४ अंतर्गत कोंढवा पोलीस ठाण्यात कारवाई करण्यात आली आहे.

लोकसत्ता – दि. २२ डिसेंबर, २०१९

# स्टेशनरी विक्रेत्याकडून खंडणी मागणारा अटकेत

## एरंडवणे भागातील घटना

**पुणे :** एरंडवणे भागातील स्टेशनरी विक्रेत्याच्या दुकानात शिरून त्याच्याकडून पाच हजारांची खंडणी मागणाऱ्या एकाला अटक करण्यात आली.

या प्रकरणी सचिन सुभाष जाधव (वय २९, रा. गणेशनगर, शनि मंदिराशेजारी, एरंडवणे) याला अटक करण्यात आली. याबाबत स्टेशनरी व्यावसायिकाने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचे एरंडवणे भागात स्टेशनरी साहित्य विक्रीचे दुकान आहे. जाधव दोन दिवसांपूर्वी तक्रारदाराच्या दुकानात गेला आणि त्याने पाच हजार रुपयांची मागणी केली. तक्रारदाराने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर जाधवने शिवीगाळ केली. काही वेळानंतर जाधव दुकानात शिरला. त्याने लोखंडी गज दुकानातील काचेवर मारला आणि तक्रारदार व्यावसायिकला गजाने मारहाण केली. या घटनेत तक्रारदार जखमी झाला. जाधव तेथून पसार झाला. त्याला पोलिसांकडून अटक करण्यात आली असून सहायक पोलीस निरीक्षक खोले तपास करत आहेत.

# सोनसाखळीचोरीचे आठ गुन्हे उघड

येरवडा : सोनसाखळीचोरीप्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींनी विश्रांतवाडी, हडपसर, लोणीकाळभोर, खडकी, सांगवी आणि चतुःश्रृंगी हद्दीत एकूण आठ चोऱ्या केल्याची कबुली दिली आहे. आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

दीपक परशुराम माळी (वय २१, रा. केशवनगर, मुंढवा) आणि प्रवीण नीलेश कचवे (वय २०, रा. केशवनगर, मुंढवा) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. विश्रांतवाडीत एकाच दिवशी दोन सोनसाखळीचोरीच्या घटना घडल्या होत्या. यामुळे पोलिसांनी चोरांना पकडण्यासाठी स्वतंत्र पथक तयार केले होते. या दरम्यान हडपसर, लोणी काळभोर, खडकी, सांगवी परिसरात पुन्हा सोनसाखळीचोरीचे गुन्हे घडल्याने शहरात खळबळ उडाली होती.

> शहर आणि उपनगरात सोनसाखळीचोरीचे आठ गुन्हे आरोपींनी केले आहेत. पोलिसांकडून गुन्ह्यातील मुद्देमाल शोधण्यात येत असून, लवकरच चोरीचे दागिने हस्तगत केले जातील.
>
> – अरुण आव्हाड, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, विश्रांतवाडी

पाच दिवसांत पोलिसांनी परिसरातील शंभरहून अधिक 'सीसीटीव्ही' तपासले होते. याआधारे बुधवारी आरोपींना अटक करण्यात आली.

गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अंजुम बागवान, रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अनिकेत भिंगारे, संदीप देवकाते, शाम शिंदे, अतुल मेंगे आणि अशोक शेलार यांनी ही कामगिरी केली.

**पुण्यनगरी** – दि. १३ डिसेंबर, २०१९

# नायजेरियनकडून कोंढव्यात कोकेन जप्त

**पुणे :** अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका नायजेरियन नागरिकास अमली पदार्थ विरोधी पथक पश्चिमने पकडले. त्याच्याकडून ९६ हजारांचे १६ ग्रॅम कोकेन, मोबाइल, दुचाकी, ७५ हजारांची रोकड आदी २ लाख ७ हजारांचा ऐवज जप्त केला. नादी ओडीनाका हेंद्री (वय ३४, रा.३८ मॅजेस्टिक सोसायटी, कोंढवा) असे पकडलेल्या नागरिकाचे नाव आहे. दुसऱ्या एका कारवाईत बिस्मा एंटरप्रायझेस, कॅम्प, पुणे या होलसेल दुकानावर कारवाई करीत दीड लाखांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच चालक साजीद शेख हसन (वय ४०, रा. कॅम्प, पुणे) यास पुढील कारवाईसाठी लष्कर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

**लोकमत** – दि. ३ डिसेंबर, २०१९

# वेश्याव्यवसायात मुलींना विकणारा एजंट जाळ्यात

## ९ महिन्यांनंतर लागला हाती : मोबाईलमधील फोटोवरून झाला उलगडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** बांगलादेशातील तरुणींना नोकरीचे आमिष दाखवून पुण्यात आणून वेश्याव्यवसायासाठी विक्री करणाऱ्या पश्चिम बंगालमधील एका एजंटला फरासखाना पोलिसांनी अटक केली आहे. त्याने ९ महिन्यांपूर्वी पार्लरमध्ये काम देतो, असे सांगून फसवून तिची विक्री केली होती. पोलिसांनी या तरुणीची वेश्या व्यवसायातून सुटका केली होती. त्यानंतर आता या एजंटला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.

जाहीद हकाम शेख (वय ३०, रा. पासपोटा ठाणा, गायघाटा, जि. उत्तर २४ परगणा) असे त्याचे नाव आहे. फरासखाना पोलीस ठाण्यातील तपास पथकातील पोलीस अधिकारी, कर्मचारी २२ नोव्हेंबरला बुधवार पेठेतील घाटा गल्ली येथे गस्त घालत होते. त्यावेळी जाहीद शेख हा घाईघाईने जात होता. पोलिसांना पाहून तो उलट पावली परत जाऊ लागला. त्यामुळे संशय येऊन पोलिसांनी त्याला पकडले. त्याची चौकशी करता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. तेव्हा त्याला पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याच्याकडे असलेल्या मोबाईल फोनमध्ये काही मुलींचे फोटो होते. त्याअनुषंगाने फरासखाना पोलिसांनी तपासणी केल्यावर बांगलादेशातील एका १६ वर्षांच्या तरुणीची पोलिसांनी २८ सप्टेंबर रोजी वेश्या व्यवसायातून सुटका केली होती. तिचा तो फोटो असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी बाल कल्याण मंडळाची परवानगी घेऊन हडपसर येथील रेस्क्यू फाऊंडेशनमध्ये ठेवण्यात आलेल्या या तरुणीला जाहीद शेख याचा फोटो दाखविला. तेव्हा तिने फोटो ओळखला व त्याचे नाव रुबल ऊर्फ जाहीद शेख असल्याचे सांगितले. ९ महिन्यांपूर्वी रुपाली या तरुणीकडे आपल्याला पार्लरचे काम देतो, असे सांगून त्याने व त्याच्या पत्नीने बांगलादेशातून पुण्यात आणले व बुधवार पेठेतील एका बिल्डिंगमधील पूजा नावाच्या महिलेकडून पैसे घेऊन आपल्याला तेथे सोडले. पूजा हिने आपल्याकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेतला. या माहितीवरून पोलिसांनी जाहीद शेख याला अटक केली होती. अनेकदा पोलीस तरुणींची वेश्याव्यवसायातून सुटका करतात. पण, त्यांना येथे आणून विक्री करणारे एजंट कधी हाताला लागत नाहीत. पोलिसांच्या तीक्ष्ण नजरेमुळे हा एजंट हाती लागला आहे.

ही कामगिरी पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, सहायक आयुक्त प्रदीप आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर, पोलीस निरीक्षक दादासाहेब गायकवाड, उपनिरीक्षक यशपाल सूर्यवंशी, हवालदार दत्ता जाधव, बापू खुटवड यांनी केली.

**महाराष्ट्र टाइम्स – दि. १३ डिसेंबर, २०१९**

# कोकेनविक्री करणारा अटकेत

पुणे : कोंढवा परिसरात कोकेनची विक्री करण्यासाठी आलेल्या नायजेरियन व्यक्तीला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडून कोकेनसह दोन लाख रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नादी ओडीनाका हेंद्री (वय ३४, रा. मॅजेस्टिक सोसायटी, कोंढवा) असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून ९६ हजार रुपये किमतीचे १६ ग्रॅम कोकेन, तीन मोबाइल, मोपेड, ७५ हजारांची रोकड, पासपोर्ट असा दोन लाख सात हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. हेंद्रीच्या विरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी पथक गस्तीवर असताना कोंढवा परिसरात नायजेरियन व्यक्ती कोकेन विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक यांच्या पथकाने सापळा रचून हेंद्रीला ताब्यात घेतले.

**पुण्यनगरी – दि. १९ डिसेंबर, २०१९**

# दोन किलो गांजा कोथरूडमधून जप्त

**पुणे** : कोथरूडमधील चांदणी चौकातील रिक्षा थांब्याजवळून एका युवकास ताब्यात घेतले, तसेच पोलिसांनी त्याच्याकडून ३८ हजार रुपये किंमतीचा दोन किलो गांजा जप्त केला. अमली पदार्थविरोधी पथक पूर्व विभागाने मंगळवारी दुपारी पावणेपाच वाजण्याच्या सुमारास ही कारवाई केली.

सुधीर नामदेव महाडिक (वय २१, रा. नेरूळ, सेक्टर नं. १८, नवी मुंबई) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे शहरात बेकायदेशीररीत्या गांजा पुरवठा करणाऱ्या आरोपींवर कारवाईसाठी अमली पदार्थ विरोधी पथकाकडून गस्त वाढविण्यात आली आहे. दरम्यान, कोथरूड हद्दीत एक युवक गांजा घेवून फिरत आहे, अशी माहिती मिळताच चांदणी चौकात सापळा लावला तसेच सुधीर महाडिक याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे असलेल्या पिशवीमध्ये १ किलो ९४६ ग्रॅम्स वजनाचा गांजा आढळून आला.

# अभिप्राय...

## - दर्पण विशेष अंक संदर्भात अभिप्राय –

दर्पण म्हणजे आरसा. पोलीसांनी केलेल्या चांगल्या व जनहित कारक कामाचे बाबतीत, प्रसिध्दी माध्यमाकडून नेहमीच दुर्लक्ष केले जाते. अपवादात्मक परिस्थीती वगळता पोलीसांचे लोक कल्याणकारी व चांगले कामास कधीच प्रसिध्दी दिली जात नाही. याउलट एखादया नकारात्मक बातमीस प्रभावीपणे प्रसिध्दी दिली जाते. यामुळे पोलीसांचे कार्यपध्दती बाबत जनमाणसांचे मनात नेहमीच नकारात्मक भावना निर्माण होत होती.

परंतु, मा.पोलीस आयुक्त पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाने, पुणे शहर पोलीसांकडून पोलीसांचे चांगले काम (Good work) बाबतचा दर्पण विशेष अंक प्रसिध्द होत असल्याने पोलीसांचे चांगले कामाची जनतेस आरशाप्रमाणे माहिती उपलब्ध होत असल्याने पोलीसांचे कामकाजाविषयी नागरीकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होण्यास व पोलीसांची प्रतिमा उंचावणेस नक्कीच मदत होत आहे.

बी.ए.गायकवाड
पो.हवा.ब.नं.४५९०
येरवडा पोलीस स्टेशन पुणे.

---

दि. १३/०६/२०१९
भारती विद्यापीठ, पो.स्टे.
पुणे

नाव:- सुनिल यादवराव देशमाने.
पो.हवा. ४४०४, भा.वि.पो.स्टे. पुणे.

विषय-: पुणे शहर पोलीस दलातील दर्पण पुस्तिकेच्या अभिप्राय बाबत.

महोदय,

सन २०१८ या वर्षापासून मा. पोलीस. आयुक्त सो. यांनी दर्पण पुस्तकाचा उपक्रम अतिशय स्तुत्य झाला आहे.

या मासिकामध्ये असणाऱ्या पेपर कटींग व बातम्या या वरून पो.ठाणे येथे येणारे कुठ. नागरीक तसेच पो. अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या खात्यातील आपल्या सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबाबत माहिती मिळते तसेच आपण. काहीतरी चांगल्या गोष्टी करण्यास याबाबत प्रोत्साहन मिळते तसेच आपण करीत असलेल्या कामात काहीतरी बदल करावा असे प्रत्येक पो.अधि. व कर्मचारी यांना मार्गदर्शन या पुस्तकाद्वारे मिळत आहे.

मा. सा. व्हावे.

(S. Y. देशमाने)
HC 4404


MPSC aspirant, his friend held for finance co robbery
Bengaluru techie, wo 3 held for MBA gradu
Ex-director of IT firm held for data robbery
पोलिसांच्या दक्षतेमुळे मिळाली दागिन्यांची पिशवी
अवैध धंद्यांची यादी पोलीस वेबसाइटवर जाहीर
एस्कॉर्टसाठी तरुणी पुरविणाऱ्यास अटक
दोन सोनसाखळीचोरांना अटक
पुलिस परिमंडल-5 को आईएसओ 9001 : 2015 प्रमाणपत्र
गावठी दारूचे १५ हजार लिटर रसायन न
'सेल्फी'वरून काढला आरोपीचा माग
विश्वासासाठी नावीन्यपूर्वक कामाची गरज
तरुणाच्या खुनातील सहा आरोपी अटकेत
जेव्हा पोलीस आयुक्त विद्यार्थिनींबरोबर घेतात भोजन
Cyber police crackdown on 2K bank accounts in Rajasthan
नववर्षाच्या स्वागतासाठी पोलीसही झाले सज्ज
हजारो अमेरिकन नागरिकांची फसवणूक; कॉल सेंटर
'उत्तम संवाद हा मुलांचे भविष्य घडविण्याचा राजमार्ग'
सराईत गुन्हेगार जाळ्यात
शहर पोलीस करणार चिंतामुक्त ड्यूटी
पोलीस दलाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी शाळांमध्ये कवायत
13,000 offenders booked for drink driving in 2019
खाकी वर्दीला डाग
जीवनाच्या स्पर्धेत यशस्वी
2 detained for questioning in MBA grad murder case
WHAT HAPPENED?
मोबाईल अचानक बंद पडतो तेव्हा!
सायबर गुन्ह्यांबाबत आता विद्यार्थ्यांसाठी जागरूकता अभियान